# वेंगुर्ला नगरपरिषद, वेंगुर्ला जि. सिंधुदूर्ग

दिनांक - २०/०१/२०२५

जा.क्र/नपवें/०७/१८४/२०२५

## जाहीर सूचना

**"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"**

**"अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"**

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे एकूण ६७ सेवाची यादी प्रसिध्द केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिध्द करून नगरप्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तिंना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास नगरपरिषद वेंगुर्ला कडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपरिषद तर्फे जनमाहिती अधिकार व द्वितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी वेंगुर्ला नगरपरिषदेच्या नोटीस बोर्ड प्रसिध्द करण्यात आलेली आहे .

सही/-

(शिक्का)

**मुख्याधिकारी**

**वेंगुर्ला नगरपरिषद, वेंगुर्ला**

Scanned with OKEN Scanner